आदिवासी क्षेत्र उपयोजना /आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना सन २०१४-२०१५ चे जिल्हानिहाय व योजनानिहाय अर्थसंकल्पीत तरतुदीचे वाटप "तंत्रशिक्षण"

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः बीयुडी-२०१४/प्र.क्र.३/कार्यासन.६

मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख: २७ ऑगस्ट,२०१४

वाचा -

१) शासन परिपत्रक,वित्त विभाग क्र.अर्थसं- २०.१४/प्र.क्र.६६/अर्थ-३, दि.२९.३.२०१४.
२) शासन परिपत्रक,वित्त विभाग क्र.अंदाज- २०.१४/प्र.क्र.११०/अर्थ-३, दि.०१.०७.२०१४.

शासन निर्णय -

आदिवासी उपयोजनांतर्गत **"तंत्रशिक्षण"** या उपशिर्षाखाली सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात समाविष्ट करण्यात आलेल्या तरतुदीचे योजनानिहाय व जिल्हानिहाय वाटप आणि प्रत्येक योजानांचे नियंत्रण अधिकारी सोबत जोडलेल्या विवरणपत्रात दर्शविले आहेत.

२. सन २०१४-२०१५ करिताच्या अर्थसंकल्पीय तरतूदीपैकी एप्रिल ते नोव्हेंबर, २०१४ या आठ महिन्यांचा खर्च भागविण्यासाठी विधान मंडळाने "महाराष्ट्र विनियोजन विधेयक २०१४" (महाराष्ट्र विनियोजन (लेखानुदान) अधिनियम २०१४ यांच्या अनुसूचिच्या स्तंभ ४ मध्ये विर्निदिष्ट करण्यात आलेल्या रकमांसह) मंजूर केले आहे. सदर विधेयकाचे आता अधिनियमात रुपांतर झाले असुन ते महाराष्ट्र अधिनियम क्रं.१२ म्हणुन महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग - ८ दिनांक १८ जून, २०१४ यामध्ये प्रसिध्द करण्यात आले आहे. सोबतच्या विवरण पत्रातील स्तंभ क्रमांक २ मध्ये" तंत्रशिक्षण" या उपशिर्षाखाली २०१४-१५ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात समाविष्ट करण्यात आलेल्या योजनानिहाय संपूर्ण आर्थिक वर्षाकरिताच्या अर्थसंकल्पीय तरतूदी दर्शविण्यात आल्या आहेत. तथापि सदर तरतूदीपैकी आता सन २०१४-१५ या चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या आठ महिन्याकरिता (अर्थसंकल्पीय तरतूदीच्या ६०% च्या मर्यादेत)खर्च करण्यास शासन मान्यता देत आहे. यासाठी उपलब्ध करून देण्यात आलेली तरतूद एप्रिल,२०१४ ते नोव्हेंबर,२०१४ या आठ महिन्यांसाठी संगणक वितरण प्रणालीवर उपलब्ध कॅश फ्लो प्रमाणे खर्च करण्याची दक्षता सर्व संबंधितांनी घ्यावी.

३. नियंत्रण अधिकारी आणि विभागप्रमुख यांनी ही तरतुद शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र.टिएसपी-१०८६/८७१०/प्र.क्र.३१/का.५ दिनांक ९.३.१९९० अन्वये निश्चित केलेल्या आदिवासी उपयोजना क्षेत्रातील व क्षेत्राबाहेरील मान्य योजनांवर खर्च होतील याची दक्षता घ्यावी. तसेच या तरतूदी खर्च करतांना शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्र.टिएसपी-२००३/प्र.क्र.१०१/का-६, दिनांक २६ जुलै, २००४ व टिएसपी-२००५/प्र.क्र.५९/का-६, दिनांक १०

नोव्हेंबर, २००५ मधील अटींचे कटाक्षाने पालन करण्याची दक्षता घेण्यात यावी. तसेच प्रस्तुत शासन निर्णयाद्वारे वितरित करण्यात येत असलेल्या तरतूदी मासिक खर्च विवरणपत्राप्रमाणे खर्च करण्याची दक्षता सर्व नियंत्रक अधिका-यांनी घ्यावी.

४. आदिवासी उपयोजनेंतर्गत उपलब्ध करुन दिलेली तरतूद फक्त आदिवासी लोकांकरिता वा आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत खर्च करण्यात यावी. तसेच आदिवासी क्षेत्राबाहेरील क्षेत्रासाठी केलेली तरतूद त्या क्षेत्रातील आदिवासी लोकांकरिता खर्च करण्यात यावी. आदिवासी उपयोजनेंतर्गत केलेली तरतूद आदिवासी क्षेत्राबाहेर किंवा सर्वसाधारण योजनेखाली खर्च करण्यात येवू नये. जर आदिवासी उपयोजनेत केलेली तरतूद खर्च झाली नाही तर सदर तरतूद प्रत्यार्पित करावी व कोणत्याही परिस्थितीत आदिवासी क्षेत्राबाहेर खर्च करण्यात येवू नये. जर आदिवासी उपयोजनेची तरतूद आदिवासी क्षेत्राबाहेर खर्च झालेली आढळल्यास याबाबत आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक, संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास, संबंधित जिल्हाधिकारी व नियोजन अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल. तसेच आदिवासी उपयोजनेंतर्गत जिल्हा योजनांसाठी उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीतून झालेल्या खर्चाचा अहवाल लेखाशिर्षनिहाय/उप लेखाशिर्षनिहाय तसेच साध्य झालेले भौतिक उद्दिष्टनिहाय माहिती जिल्हाधिकारी तसेच नियोजन अधिकारी यांनी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक, संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास व आदिवासी विकास विभागस प्रत्येक महिन्यात १० तारखेपर्यंत न चुकता पाठवावी.

५. विभागाच्या दिंनाक १६ डिसेंबर, २००९ च्या शासन निर्णयाव्दारे जिल्हास्तरीय योजना जिल्हाधिकारी यांच्याकडे राबविण्यासाठी देण्यात आल्या आहेत. जिल्हा योजनांसाठी प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेले असल्यामुळे योजनेसाठी केलेली तरतूद त्याच योजनेवर त्याच जिल्ह्यात खर्च करणे बंधनकारक राहिल. त्यानुसार जिल्हा योजनेसाठी केलेली तरतूद जिल्हाधिकारी यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली आहे. तथापि, हाती घेण्यात येणारी कामे संबंधित विभागातील क्षेत्रिय अधिकारी यांनी जिल्हाधिकारी, आयुक्त,आदिवासी विकास, नाशिक, संबंधित अपर आयुक्त व प्रकल्प अधिकारी यांचेशी चर्चा करुन निश्चित करावी. प्रगतीपथावरील (ongoing works) कामांपैकी ज्यामध्ये ५० टक्के पेक्षा जास्त खर्च झालेला आहे त्यांच्यावर खर्च करावा. अपवादात्मक परिस्थितीत अशी कामे ज्यावर ५० टक्के पेक्षा कमी खर्च झालेला आहे व त्यास पूर्ण करणे गरजेचे आहे त्याबाबत शासनाची पूर्व परवानगी घेऊन पुढील कार्यवाही करावी. तसेच जिहास्तरीय योजनेतील कामांची तपासणी करण्याचे अधिकार व जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी तसेच प्रकल्प अधिकारी, अपर आयुक्त व आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांची संयुक्तीकरित्या राहिल.

६. नियंत्रण अधिकारी व विभाग प्रमुख यांनी आदिवासी उपयोजना क्षेत्रात अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रात तसेच आदिवासी उपयोजने क्षेत्राबाहेरील योजनांवर केलेला खर्च स्वतंत्रपणे नोंदविला जाईल याची दक्षता घ्यावी. जेणेकरुन शासनाला आदिवासी क्षेत्रातील व उपयोजने क्षेत्राबाहेरील योजनांवर होणा-या खर्चावर लक्ष ठेवता येईल व तो केंद्रशासनाला कळविता येईल.

७. नियंत्रण अधिकारी/विभाग प्रमुख यांनी नियम प्रचलित कार्यपध्दती व सध्याच्या शासकीय धोरणास अनुसरुन चालू योजनांवर खर्च करावा. हे आदेश फक्त अंमलबजावणी /नियंत्रक अधिका-यांच्या अधिनस्त ठेवलेल्या तरतुदीस प्रशासकीय दृष्टया मान्य केलेल्या चालू योजनांवर खर्च करण्यासाठी आहे. याची अंमलबजावणी अधिका-यांनी नोंद घ्यावी.

८. आदिवासी उपयोजनेअंतर्गत आदिवासी क्षेत्र उपयोजना (टिएसपी) व आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना (ओटिएसपी) यांचा खर्च स्वतंत्रपणे नोंदविण्यासाठी लेखाशिर्षामध्ये काही बदल करण्यात आले असल्यास हे बदल लक्षात घेवून खर्च नोंदविताना सुधारित लेखाशिर्ष नोंदविण्याची दक्षता सर्व संबंधितांनी घ्यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०८२७१०२९४६०३२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Naik Suresh D

Digitally signed by Naik Suresh D
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=MTD, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Naik Suresh D
Date: 2014.08.27 12:59:23 +05'30'

(सु. द. नाईक)
कार्यासन अधिकारी

प्रत,

१. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.

३. अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक / नागपूर / अमरावती / ठाणे.

४. जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे / नाशिक / नंदुरबार/ पुणे/ बुलढाणा/ अमरावती/ यवतमाळ/ नागपूर /चंद्रपूर / गडचिरोली

५. जिल्हाधिकारी व सदस्य सचिव, जिल्हा नियोजन व विकास मंडळ, ठाणे / नाशिक / नंदुरबार/ पुणे/ बुलढाणा/ अमरावती/ यवतमाळ/नागपूर/चंद्रपूर/ गडचिरोली

६. **सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प**

७. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.

८. महालेखापाल (लेखापरिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.

९. उच्च व तंत्र शिक्षण विभाग/ वित्त विभाग/ नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

१०. सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

११. कार्यासन अधिकारी का.क्र. २, व १२, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय,मुंबई.

१२. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, ५ वा माळा, मुंबई.

१३. निवड नस्ती (का-६)

आदिवासी क्षेत्र उपयोजनेखालील मार्च, २०१४ च्या अधिवेशनात मंजूर झालेल्या तरतूदीचे वाटप

शिर्ष :- तंत्र शिक्षण योजनेचे नाव :- माध्यमिक शालांत परिक्षा पूर्व तांत्रिक / शिक्षणाच्या सुविधात वाढ करणे (रुपये हजारात)	मागणी क्रमांक :- टी-५ मुख्य लेखाशिर्ष :- २२०३-तंत्र शिक्षण- पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-७९६- जनजाती क्षेत्र उपयोजना (०१) जनजाती क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना (०१) (०२) माध्यमिक शालांत परिक्षापूर्व तांत्रिक शिक्षणाचा विकास जिल्हा जिल्हास्तर योजना (२२०३ ०७३९)	
२०१४-१५ ची अर्थसंकल्पीय तरतुद सुपुर्द करण्यात आलेला नियंत्रण अधिकारी	प्रशासकीय विभाग	शेरा
संबंधित जिल्हाधिकारी	उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई	

जिल्हयाचे नाव	टिएसपी/ओटिएसपी	२०१४-१५ साठी केलेली बाबनिहाय तरतुद										
१		२										
		०१,वेतन	०६,दुरध्वनी व वीज	१०,कंत्राटी सेवा	११,प्रवास खर्च	१३,कार्यालयीन खर्च	१४,भाडे पटटी व कर	१७-संगणक खर्च	२१,सामुग्री व पुरवठा	२८,व्यावसायीक व विशेष सेवा	५२, यंत्रसामुग्री	**एकूण**
ठाणे	टिएसपी										३०१	**३०१**
नाशिक	टिएसपी	३५००	१००	३००	१७५	१२५		२०	२००	१००	५४५	**५०६५**
नंदुरबार	टिएसपी	५०००	३००	७००	१७५	२००		४०	४००	२००	१८५०	**८८६५**
पूणे	टिएसपी	३०००	६०	२५०	७५	५०		२०	२००	१००	३०५	**४०६०**
बुलढाणा	ओटिएसपी										३८	**३८**
अमरावती	टिएसपी										२००	**२००**
यवतमाळ	टिएसपी -१२५८९ ओटिएसपी-६०००	३५००	६०	२५०	७५	१२५	१००	२०	२००	१००	१४१५९	**१८५८९**
नागपूर	टिएसपी -२५० ओटिएसपी-७५०										१०००	**१०००**
चंद्रपूर	टिएसपी										५०	**५०**
गडचिरोली	टिएसपी										१७००	**१७००**
एकूण		**१५०००**	**५२०**	**१५००**	**५००**	**५००**	**१००**	**१००**	**१०००**	**५००**	**२०१४८**	**३९८६८**